बीड । गुरूवार
०१.०५.२०२५
वर्षे : ५ अंक : ३१
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955





# शेतकऱ्यांनो, २९ ऑगस्टपर्यंत कामे पूर्ण करा
# चलो मुंबई, चलो मुंबई, चलो मुंबई



## मराठा आंदोलक जरांगेंचा निर्णय

**जालना । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण लढ्याचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. त्यांनी सरकारकडे पाच ते सहा मागण्या केल्या असून त्या २८ तारखेपर्यंत मागण्या मान्य झाल्या नाही तर २९ तारखेपासून मुंबईत आंदोलन होणार असून येताना एकतर विजयाचा रथ येईल किंवा अंत्ययात्रेचा; असा निर्धार जरांगेंनी बोलून दाखवला, ते बुधवारी माध्यमांशी बोलत होते.

जरांगे पाटील म्हणाले की, शिंदे समितीने चांगलं काम केलं, त्यांच्याकडून सरकारने काम करुन घेतलं. त्यामुळे सरकराचं मी कौतुक केलं. ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, मात्र अधिकारी प्रमाणपत्र देत नाहीत. काही अधिकारी जातीयवाद करीत नाहीत. प्रमाणपत्र दिलं तर मुद्दामहून व्हॅलिडिटी दिली जात नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचं नुकसान होत आहे. एका मुलाचं ॲडमिशन रद्द झालं, त्यानंतर दोन- तीन दिवसात व्हॅलिडिटी मिळाली. हे सरकारचं षडयंत्र तर नाही ना? ज्या नोंदी सापडल्या आहेत, त्याची माहिती ग्रामपंचायतीच्या फलकावर चिटकाव्यात.. गावात दवंडी देऊन माहिती द्यावी. त्या नोंदींवरुन तातडीने प्रमाणपत्र वाटप करायला सुरुवात करा. जिथल्या नोंदी असतील त्या ग्राह्य धरुन मराठ्यांना हक्क दिला पाहिजे. जर कुणी अधिकारी हलगर्जीपणा करीत असेल तर त्याला बडतर्फ करा, अशी माझी मुख्यमंत्र्यांकडे आहे.

मनोज जरांगे पुढे म्हणाले, दुसरी मागणी अशी की, मराठा आणि कुणबी एकच असल्याचा अध्यादेश काढा, कारण ५८ लाख नोंदी सापडलेल्या आहेत. तिसरी मागणी, सगेसोयत्याची अंमलबजावणी करा.. कारण ते सगळ्या जाती-धर्मासाठी आहे. सगळ्या गोरगरीबांचे त्यामुळे कल्याण होणार आहे. सगळ्या जाती-धर्मातल्या मुलींना मोफत शिक्षण देण्याची मागणी आम्ही केली होती. त्यामुळे सर्व ▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात

### पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा



**बीड । प्रतिनिधी**

पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा पुढीलप्रमाणे आहे. गुरुवार दि. १ मे २०२५ रोजी सकाळी ८.३० वाजता जालना येथून वाहनाने परळी वैद्यनाथ जि. बीडकडे प्रयाण सकाळी ११.०० वाजता बीड येथे आगमन व परळी वैद्यनाथ येथील दिवाणी व फौजदारी न्यायलयाचे नुतन इमारतीच्या कोनशिला समारंभास उपस्थिती. दुपारी १.०० ते ३.०० वाजेपर्यंत यशश्री निवासस्थान परळी येथे अभ्यांगतांच्या भेटी व संवाद. दुपारी ४.०० वाजता भारतीय जनता पार्टीच्या बीड जिल्हयातील नवनिर्वाचित मंडळ अध्यक्षांशी संवाद व सत्कार. सायंकाळी ५.३०. वाजता परळी वैद्यनाथ येथून वाहनाने अंबाजोगाईकडे प्रयाण. सायंकाळी ६.०० वाजता आगमन व डॉ. विजय कराड यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट सायंकाळी ६.३० वाजता वाहनाने परळीकडे प्रयाण. सायंकाळी ७.०० वाजता यशश्री निवासस्थान,परळी येथे आगमन व राखीव. शुक्रवार दि. २ मे २०२५ रोजी सकाळी १०.५० वाजता वाहनाने नटराज रंगमंदिर, परळीकडे प्रयाण. सकाळी ११.०० वाजता आगमन व राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत पशुपालकांच्या एक दिवशीय कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी ७.०० वाजता यशश्री निवसस्थान परळी येथे आगमन व राखीव. शनिवार दि. ३ मे २०२५ रोजी माजलगाव तालुक्यातील किट्टी आडगाव येथून वाहनाने जालनाकडे प्रयाण.

### उद्योग राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांचा दौरा

**बीड । प्रतिनिधी**

उद्योग,सार्वजनिक बांधकाम उच्च व तंत्र शिक्षण आदिवासी विकास पर्यटन, मृद व जलसंधारण मंत्री इंद्रनील नाईक यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. बुधवार दि. ३० एप्रिल २०२५ रोजी दुपारी २.०० वाजता राज राजेश्वर मंदिर अकोला येथून मोटारी बीडकडे प्रयाण. सायंकाळी ७.०० वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. गुरुवार दि. १ मे. २०२५ रोजी सकाळी ७.३० वाजता शासकीय विश्रामगृह येथून मोटारीने जिल्हा पोलीस मुख्यालय, नगर रोड बीडकडे प्रयाण. सकाळी ७.५० वाजता जिल्हा पोलीस मुख्यालय येथे आगमन. सकाळी ८.०० वाजता मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमास उपस्थिती.सकाळी ९.०० वाजता जिल्हा पोलीस मुख्यालय येथून मोटारीने शासकीय विश्रामगृहाकडे प्रयाण. सकाळी ९.१० वाजेपर्यंत आगमन व राखीव.

### परळी वै. दिवाणी व फौजदारी नूतन इमारत न्या. सूर्यवंशी यांच्या हस्ते आज होणार कोनशिला समारंभ

**बीड । प्रतिनिधी**

परळी वैद्यनाथ येथे बांधण्यात येणा-या दिवाणी आणि फौजदारी न्यायालय नूतन इमारतीचा कोनशिला समारंभ गुरुवार दि. १ मे २०२५ रोजी, महाराष्ट्र दिनी मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नितीन भगवंतराव सूर्यवंशी यांच्या हस्ते सकाळी ११.०० वाजता होणार आहे. या कार्यक्रमास राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती रविंद्र मधुसूदन जोशी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश आनंद लक्ष्मीकांत यावलकर हे असतील. या कोनशिला समारंभास उपस्थित रहावे असे आवाहन परळी वकील संघाचे अध्यक्ष ड हरिभाऊ गुटटे आणि दिवाणी न्यायधिश (क स्तर) तथा न्यायदंडाधिकारी दीपक बोर्डे यांनी केले आहे.

## प्रधानमंत्री आवास योजनेच्या सेल्फ सर्व्हेसाठी मुदतवाढ

### १५ मे पर्यंत सर्व्हे करून घेण्याचे आ.संदीप क्षीरसागरांकडून आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

पात्र असलेल्या नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत नव्याने घरकूल मिळणार असून. त्याकरिताऑनलाईन सेल्फ सर्व्हे करण्याचा अंतिम दिनांक ३० एप्रिल २०२५ होता. त्याला आता १५ दिवसांची मुदतवाढ मिळाली असून १५ मे २०२५ पर्यंत नागरिकांना मोबाईल पद्वारे सेल्फ सर्व्हे करता येणार आहे. त्यामुळे बीड मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यातील ज्या नागरिकांचे सेल्फ सर्व्हे करणे बाकी आहे अशा निकषपात्र नागरिकांनी आपल्या मोबाइलद्वारे किंवा आपल्या ग्रामसेवकामार्फत १५ मे पर्यंत सेल्फ सर्व्हे करून घ्या असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेत समाविष्ट होण्यासाठी सध्या सद्या सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यामध्ये आपली नोंदणी करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी/ ग्रामसेवक यांचे मार्फत किंवा आपण स्वतः सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करू शकता. निकषांचे पालन करून कच्चे घर असणाऱ्यांनी प्रधानमंत्री आवास योजनेसाठी सेल्फ सर्व्हे करून आपली नोंदणी करून घ्यावी, नोंदणी



करण्यासाठी १५ दिवसांची मुदतवाढ मिळालेली आहे. १५ मे ही शेवटची तारीख असून त्या अगोदरच बीड मतदारसंघातील पात्र नागरिकांनी आपली नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन आ.संदीप क्षीरसागर यांच्याकडून करण्यात आले आहे.

#### ● अडचण असल्यास संपर्क साधावा

घरकुल सेल्फ सर्व्हेच्या प्रक्रियेत कोणत्याही टप्प्यावर अडचण असल्यास आपल्या ग्राम सेवक / ग्रामपंचायत अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच काही तांत्रिक अडचण असल्यास १८००-११०-१११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क करावा. यासोबतच प्रशासनासंबंधित काही तक्रार असल्यास किंवा आर्थिक मागणी होत असल्यास ९७६६२७२७२४, ९३७३६०३११९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

अशाप्रकारे करावा सेल्फ सर्व्हे

सेल्फ सर्व्हे करण्यासाठी आवास प्लस- २०२४ हे शासनाचे अधिकृत प्ले-स्टोअरवरून आपल्या मोबाईलमध्ये इंस्टॉल करावे, ▶▶ उर्वरित पान २ वर

## कार्यकर्त्यांच्या विजयासाठी दोन पाऊले पुढे राहील : आ. विजयसिंह पंडित



### ● महाराष्ट्र गौरव यात्रेचे गेवराईत जल्लोषात स्वागत

**गेवराई । प्रतिनिधी**

माझी निवडणुक झाली, आता कार्यकर्त्यांच्या निवडणुकीची वेळ आहे, कार्यकर्त्यांच्या विजयासाठी दोन पाऊले पुढे राहून काम करेल असा विश्वास आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र गौरव यात्रेच्या स्वागत प्रसंगी ते बोलत होते. यावेळी गोदावरी आणि सिंदफणा नदीचे पाणी संकलित करून त्याचे मंगल कलशात विधीवत पूजन करण्यात आले. महाराष्ट्र गौरव यात्रेचा उद्देश यानिमित्ताने समन्वयक आ. विक्रम काळे आणि ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे यांनी विषद केला. महाराष्ट्राच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त ▶▶ उर्वरित पान २ वर



## बीड शहर पोलिसांचा गुटख्याच्या अड्ड्यावर छापा; साडेचार लाखाचा मुद्देमाल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर पोलिसांना खात्रीशीर माहिती मिळाली होती की शहरात काही ठिकाणी गुटखा साठा करून ठेवला आहे, आणि लवकरच तो माल पानटपरी, आणि किराणा दुकानदार वरून वितरित होणार आहे... यावरून पोलिसांनी पथक तयार करून छापा मारला असता, एकूण साडेचार लाखाचा मुद्देमाल मिळून आला आहे, यात मोमीन मोहम्मद तक्युदिन पिता फजिउद्दीन राहणार हत्तीखाना, बीड यास अटक करण्यात आली असून यातील आरोपी वाजेद हा फरार आहे. तसेच यामध्ये एक अल्पवयीन मुलगा सुद्धा ताब्यात घेण्यात आला होता. यामध्ये आणखी आरोपी निष्पन्न होणार असून हा माल कोठे कोठे पाठवला गेला होता, कोण कोणत्या पान टपरीवर हा सप्लाय केला जात होता, याचा तपास करुन निष्पन्न झालेल्यांना आरोपी करुन यामध्ये पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहेत. यातील अटक आरोपीला तीन दिवसांची पीसीआर मिळाली आहे. पोलिस अधीक्षक श्री नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस ▶▶ उर्वरित पान २ वर

## पाणीप्रश्नासाठी कायम शेतकर्यांच्या सोबत

### खा. रजनीताई पाटील यांच्याशी शेतकर्यांची चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

सिंदफणा पट्टा व लगतच्या भागात गेल्या दोन वर्षांपासून दुष्काळी परिस्थिती आहे. पाऊस नसल्याने अनेक शेतकर्यांनी फळबागा तोडल्या आहेत तर कोरडवाहू शेतकरीही अडचणीत आले. दुष्काळी भागातील



पाणीप्रश्न सोडविण्यासाठी शेतकर्यांनी लोकलढा आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलकांनी खासदार रजनीताई पाटील यांची भेट घेऊन जायकवाडीचे पाणी दुष्काळी भागाला मिळावे यासाठी साकडे घातले. यावेळी भाऊसाहेब जरांगे ▶▶ उर्वरित पान २ वर


## जिल्हाधिकारी कार्यालय व प्रशासकीय ईमारत येथे ध्वजारोहण

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात विविध ठिकाणी ध्वजारोहण केले जाणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयातील ध्वजारोहण जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते १ मे रोजी सकाळी ७.१५ वाजता होणार आहे. तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील ध्वजारोहणाचा कार्यक्रम अप्पर जिल्हाधिकारी हरीष धार्मिक बीड, यांच्या हस्ते




सकाळी ७.०० वाजता संपन्न होणार असून दोन्हीही ध्वजारोहण समारंभ संपल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हा पोलीस मुख्यालय मैदान, बीड येथील ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास सकाळी ७.४५ पूर्वी शासकीय गणवेषात उपस्थित रहावे. असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.






# 1 मे – संघर्ष , सन्मान आणि अस्मितेचा दिवस




चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार , बीड

सकाळी ऑफिसला जाणाऱ्या लोकांच्या चेहऱ्यावर जरा वेगळाच उत्साह असतो. सरकारी इमारतींवर ध्वज फडकत असतो. शाळांमध्ये विशेष कार्यक्रमांची तयारी चाललेली असते . आणि अनेक ठिकाणी रस्त्यांवरून एखादी उत्साही रॅली जाताना दिसते . हाच तो दिवस – १ मे . परंतू हे सगळं केवळ एक दिवस म्हणून पाहिलं , तर त्यामागचा इतिहास, संघर्ष, आणि गौरव आपल्याला उमगणार नाही. या एका तारखेत दोन लढ्यांची , दोन वेगवेगळ्या पण समांतर वाटचालींची आठवण दडलेली आहे – कामगारांच्या हक्कांची आणि मराठी अस्मितेच्या स्वाभिमानाची.

कामगारांची जागतिक चळवळ – श्रमाचा सन्मान

१८८६, अमेरिकेतील शिकागो. धूळ उडवत चाललेले हजारो पाय. मागणी होती – आठ तासांचा कामाचा दिवस. कारखान्यांमध्ये दिवसाचे १२–१६ तास राबवले जात होते. कामाच्या ठिकाणी सुरक्षा नव्हती, सुट्ट्या नव्हत्या, आणि आरोग्य व्यवस्थेची तर कोणी कल्पनाही केली नव्हती . शिकागोतील हे आंदोलन चिरडायला पोलिसांनी गोळीबार केला, अनेकजण शहीद झाले . पण त्याचवेळी, श्रमाला आवाज मिळाला . त्याच लढ्यातून जन्म झाला – 'मजूर दिना'चा , ज्याला आपण मराठीत ' कामगार दिन ' म्हणतो. ही लढाई केवळ अमेरिकेपुरती मर्यादित राहिली नाही. जगभर पसरली. भारतात १९२३ साली चेन्नईत ( तेव्हाचं मद्रास ) पहिल्यांदा १ मे ' कामगार दिन ' म्हणून साजरा करण्यात आला . ही चळवळ देशभर कामगार संघटनांमध्ये पसरत गेली .

आज अनेक ठिकाणी कामाचे ठरलेले तास, सुट्ट्या, सुरक्षा व्यवस्था दिसतात – पण ते काही आपसूक आलेले नाहीत . या सगळ्या मागे एका दीर्घ लढ्याची, संघटनेची, त्यागाची आणि बलिदानाची कथा आहे .

आधुनिक काळात ' कामगार ' ही संकल्पना बदलली आहे . फक्त कारखान्यातला कामगार नव्हे – तर रिक्षाचालक , बांधकाम मजूर, महिला बचत गटांतील महिला, डिलिव्हरी बॉय , तंत्रज्ञान क्षेत्रातील फ्रिलान्सर्स , IT मधील काम करणारे , शेतीतले कामगार – हे सारेच आजच्या अर्थव्यवस्थेचे शिल्पकार आहेत. पण अजूनही अनेक क्षेत्रांमध्ये कामाच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न आहेत . कधी कधी आपल्या नजरेस पडतही नाही, पण आपल्याला मिळणाऱ्या अनेक सेवांमागे अदृश्य श्रमाचा मोठा हात असतो. 'कामगार दिन' म्हणजे या श्रमांची आठवण ठेवण्याचा दिवस आहे – केवळ एक दिवस साजरा करण्यासाठी नव्हे, तर रोजच्या आयुष्यात त्यांचं योगदान समजून घेण्यासाठी.

महाराष्ट्र दिन – अस्मितेचा संघर्ष आणि गौरव : 'महाराष्ट्र ' हे नाव आज आपण किती सहज उच्चारतो. पण त्या नावामागेही एक लढा आहे. एक प्रखर आंदोलन आहे. आणि शेकडो हुतात्म्यांचं बलिदान आहे. १९५० च्या दशकात, राज्य पुनर्रचनेचा मुद्दा देशात गाजत होता श्र. भाषिक आधारावर राज्यं बनवायचं ठरलं . मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र महाराष्ट्र राज्य हवं, ही मागणी तितक्याच तीव्रतेने पुढे आली. संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली . गावोगावी सभा झाल्या, मोर्चे निघाले. या आंदोलनाचा केंद्रबिंदू होता – मुंबई . गुजराती भाषिकांसाठी स्वतंत्र गुजरात, आणि मराठी भाषिकांसाठी स्वतंत्र महाराष्ट्र हवा – ही मागणी आता पेट घेत होती . २१ नोव्हेंबर १९५५ रोजी मुंबईतील फ्लोरा फाउंटनवर पोलिस गोळीबार झाला. १०६ हुतात्म्यांनी आपलं प्राणार्पण केलं . त्यांच्या स्मरणार्थ, आज त्याठिकाणी उभा आहे – 'हुतात्मा चौक '. हे बलिदान व्यर्थ गेलं नाही . अखेर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची अधिकृत स्थापना झाली. त्याच दिवसापासून आपण 'महाराष्ट्र दिन' साजरा करतो. शासकीय इमारतींवर ध्वज फडकतो , परेड होते , शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम होतात, आणि हुतात्म्यांना अभिवादन केलं जातं. पण या सर्व गोष्टींपलीकडे, हा दिवस आपल्याला सतत आठवण करून देतो – आपली भाषा, आपली संस्कृती , आपली ओळख – ही फक्त परंपरेत टिकत नाही, तर ती लढून मिळवावी लागते. या दोन घटनांचं एकत्र येणं म्हणजे एक विलक्षण योगायोगच नव्हे – तर समांतर लढ्यांची एकसंध जाणीव आहे . कामगारांनी कामासाठी लढा दिला. मराठी जनतेने अस्मितेसाठी लढा दिला. दोघांचाही आधार एकच – सामूहिक संघर्ष. आजही आपल्यासमोर नवे प्रश्न आहेत – ग्रामीण भागाचा विकास, श्रमिकांचे कल्याण, आणि भाषिक अस्मिता. १ मे आपण साजरा करतो तो याच जागरासाठी – संघर्ष आठवण्यासाठी , आणि नव्या पिढीसमोर त्याची प्रेरणा ठेवण्यासाठी. महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या अनेक शुभेच्छा !

पान ४ वरून पुढे...

## जिल्हाधिकारी साहेब...

लागले. राज्य शासनाने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना राबवली असुन या योजनेचे प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे तीन तेरा वाजले असुन ही योजना गाळ माफियाने विटभट्टी धारकांच्या घशात घातली असल्याने शेतकरी या योजनेपासून वंचित राहू लागला आहे याकडे तालुका प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्र राज्य हे देशात सर्वात जास्त धरणे, जलसाठे असलेले राज्य असून या धरणांमध्ये दरवर्षी साठत चाललेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत मोठया प्रमाणात घट होत आहे. या धरणांमध्ये साचलेला गाळ उपसा करुन शेतात पसरविल्यास धरणांची मुळ साठवण क्षमता पुर्न:स्थापित होण्याबरोबरच कृषि उत्पन्नात भरीव वाढ देखील होणार आहे. सदर बाब विचारात घेऊन शासनाने राज्यातील धरणामधील गाळ काढणे व तो शेतामध्ये वापरणे यासाठी गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार हि योजना राबविण्यास शासनाने मान्यता देण्यात आलेली आहे परंतु गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेचे तीन तेरा वाजल्याचे दिसत आहे. शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी गाळ देण्या ऐवजी विटभट्टीधारकाना विकला जातोय यामुळे गाळ माफिया माला–माल तर शेतकरी कंगाल होत चालला आहे तरी याकडे तालुका प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याचे दिसून येत आहे तरी बीड जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष नवनिर्वाचित जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष देऊन हा गाळ शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी खुला करुन देण्यात यावा व गाळ माफियांच्या घशात गेलेला हा गाळ शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी देण्यात यावा व शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांतुन होत आहे.

## प्राथमिक पदवीधर....

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले की, शिक्षकांच्या मागण्या न्याय्य असून त्या शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या जातील. उपमुख्यमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्यामार्फत शासनदरबारी पाठपुरावा करून या मागण्यांची योग्य ती दखल घेण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून शिक्षकांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यावर लवकरात लवकर तोडगा काढण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीला प्रतिसाद देत, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांच्याद्वारे शिक्षकांना निरोप पाठवला आणि त्यानंतर उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले. या भेटीदरम्यान आनंद पिंगळे, सुमंत खांडे, विजय खोसे, सुमेध जोगदंड, दिपक घाटे, विकास गवते,

पान ४ वरून पुढे...

दिलीपकुमार सानप, जितेंद्र सांगळे, निलेश चव्हाण यांच्यासह शिक्षक बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, शिक्षकांनी आपल्या मागण्यांकडे शासनाने तत्काळ लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

## खते बी बियाणे...

सवलतीचा लाभ वेळेनुसार मिळत नाहीत. खरीप पेरणीच्या अगोदरच मध्यप्रदेश गुजरात मधून बोगस बियाणे महाराष्ट्रात येण्यास सुरुवात झालेली आहे तरीही कृषी मंत्री कार्यालयाकडून कारवाईच्या आदेश देण्यात आलेले नाहीत. बोगस खते बियाणे कीटकनाशकेना आळा घालण्यासाठी नवीन कृषी कायदा करताना शेतकऱ्याच्या आर्थिक नुकसान देण्यास नियमानुसार प्राधान्याने कायद्यात तरतूद करून शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा अशी मागणी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी शासनाकडे केली आहे.

## शेतकऱ्यांनो घरच्या...

डिजिटल पायाभूत सुविधेचा एक भाग आहे . ग्रीस्टॅक ही एक योजना आहे जी कृषी क्षेत्राशी संबंधित डेटा गोळा करून शेतकऱ्यांना विविध सेवा आणि फायदे पोहोचवण्यासाठी वापरली जाते . ॲग्रीस्टॅक म्हणजे शेतकऱ्यांची माहिती , जमिनीची नोंद, पीक पद्धती, हवामान, तसेच कृषी उत्पादने याचा डेटाबेस तयार करण्यासाठी तयार केलेली एक डिजिटल प्रणाली आहे . या अंतर्गत प्रत्येक शेतकऱ्याला युनिक फार्मर आयडी दिला जातो, जो आधार कार्डवर आधारित असतो . या डेटाचा उपयोग शेतकऱ्यांसाठी सरकारी योजना, कर्ज, सबसिडी, विमा, तसेच अन्य सेवांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी होतो .

फार्मर आयडी काढण्याचे फायदे : १. सरकारी योजनांचा थेट लाभ : अनुदान, पिकांसाठी कर्ज, विमा योजना यांचा लाभ थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर दिला जाईल. २. सुलभ कागदपत्र प्रक्रिया : जमीन नोंदणी व अन्य माहिती आधीच डिजिटली साठवून झालेली असल्याने शेतकऱ्यांना वेगवेगळ्या कागदपत्रांची गरज भासणार नाही . ३ . पारदर्शकता : लाभार्थ्यांची ओळख आणि फायदे थेट पोहोचतील . ४ . तंत्रज्ञानाच्या साहाय्याने निर्णयक्षमता : हवामानाचा अंदाज , पाणी व्यवस्थापन , पीक सल्ला यासाठी डेटा वापरला जातो . नुकतीच जिल्हाधिकाऱ्यांनी वासनवाडी येथील ग्रामपंचायत भेट देऊन आणि कामखेडा येथील एका सीएससी केंद्र ला भेट देऊन शेतकऱ्यांना ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडी का काढावा , याचे महत्त्व विशद करून सांगितले होते . एकोणतीस एप्रिल अखेर आकडेवारीचा विचार केला असता बीड जिल्ह्यातील अकरा तालुक्यात सहा लाख एक्कावन्न हजार इतक्या शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढायचे आहेत . यापैकी पी एम किसान योजनेचे पाच लाख

पान ४ वरून पुढे...

बावीस हजार इतके लाभार्थी आहेत . आता पावेतो तीन लाख पंचाहत्तर हजार शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढण्यात आले आहेत . टक्केवारीचा विचार केला असता सुमारे ५७ टक्के शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घेतल्याचे दिसते . सर्व उपविभागीय अधिकारी , तहसीलदार , कृषी विभागाचे अधिकारी कर्मचारी या कामी धावपळ करताना दिसत आहेत . सर्व सीएससी केंद्रावर ही नोंदणी मोफत करून देण्यात येत असते . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी अनेक वेळा शिबिरे आयोजित करून समक्ष भेटी देऊन जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढावा यासाठी प्रयत्न केला आहे.

## बॅनर,झेंडे...

अनधिकृत बॅनर, पोस्टर्स, झेंडे तात्काळ हटविण्याचे आदेश सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, नगर पालिका प्रशासन, बीड, गेवराई, शिरुर कासार, पाटोदा, आष्टी, माजलगाव, धारुर, वडवणी, अंबाजोगाई, केज, परळी येथील तहसिलदार, गटविकास अधिकारी आणि सर्व मुख्याधिकाऱ्यांना दिले आहेत.

## बनसारोळा येथे...

सचिन मुळूक यांच्याकडे मागणी केली होती. मुळूक यांनी स्वतःच्या जिल्हा नियोजन निधीतून शाळा खोली बांधकामासाठी निधी मंजूर झाला. या कामाचे भूमिपूजन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा संघटक योगेश नवले, केज तालुकाप्रमुख अण्णासाहेब पाटील ,विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने, भागवत दादा गोरे, बनसारोळा सरपंच अजित गोरे, माजी सरपंच युवराज काकडे, उपसरपंच चंद्रकांत धायगुडे, महिला ता.प्र.जयाताई राऊत, उप तालुकाप्रमुख महेंद्र चाटे, विभाग प्रमुख दत्ता काकडे ,महिला उपजिल्हाप्रमुख हरणावळ ताई, युवा सेना शहर प्रमुख आकाश चाळक सह गावातील नागरिक उपस्थित होते. दरम्यान बनसारोळाच्या विद्यार्थ्यांना नवीन शाळा इमारत मिळणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

## अंबाजोगाईतील...

प्रवाहात वाहून गेला. त्यावेळी गोदावरी नदीत सुमारे १ हजार क्युसेक वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू होता. घटनेनंतर प्रशासन आणि आपत्कालीन यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम सुरू होती, मात्र अंधार आणि वेगवान प्रवाहामुळे अडचणी आल्या. त्यामुळे बालाजीचा काहीही थांगपत्ता लागला नव्हता. बुधवारी (दि. १ मे) सकाळपासून पुन्हा एकदा शोधमोहीम राबवण्यात आली. अखेर काही तासांच्या अथक प्रयत्नांनंतर बालाजीचा मृतदेह सापडला. बालाजी अंबाजोगाई येथील केशकर्तनालयात काम करत असे. या दुर्घटनेमुळे राडी गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

पान ४ वरून पुढे...

## वन विभागाच्या....

लागवड केलेल्या जंगलातच काल दुपारी भीषण आग लागली या आगीत हजारो झाडे जळून खाक झाली आहेत. वन विभागाचे अधिकारी मात्र याकडे साफ दुर्लक्ष करत आहेत. गायरान जमिनीवर असलेल्या जंगलाला आग लागली असल्याचे काहींचे म्हणणे आहे. मात्र हे आग वन क्षेत्र असलेल्या वन विभागाच्या जागेत असणाऱ्या झाडांना लागलेली आहे. उन्हाळा अत्यंत कडक असून अंगाची लाही लाही होत आहे. आगीचे लोन संपूर्ण जंगल परिसरात पोहोचल्यास शहरातील वस्तीलाही यापासून धोका होऊ शकतो. ही आग कोणी लावली कशासाठी लावली नेमका प्रश्न उपस्थित होत आहे. उन्हाळ्यात पाणी नसल्याने अनेक झाडे जळून जातात याला पाण्याची आवश्यकता असून जंगल क्षेत्र असलेल्या नवीन झाडांना पाण्याची व्यवस्था करणे वन विभागाचे काम असून ही जबाबदारी व यासाठी शासनाकडून निधी दिला जातो. मात्र आतापर्यंत जंगल क्षेत्र असलेल्या झाडांना किती टँकरच्या साह्याने पाणी देण्यात आले. झाडे लावताना ती वाढदिवसाच्या वन विभागाची ती जबाबदारी असते मात्र अशा जंगलाला आग लावणे किंवा लागणे यामुळे वनक्षेत्राचे प्रचंड नुकसान होत आहे. फक्त काही पैशांसाठी जर ही आग लावण्यात आलेली असेल तर बीड जिल्ह्यावर दुष्काळाचे सावट या अधिकाऱ्यांमुळेच येऊ शकते. इमामपूर रोडवर लागलेली आग संध्याकाळपर्यंत विझलेली नाही. या गंभीर बाबीकडे वनपरिक्षेत्र अधिकारी कधी लक्ष देणार. बीड जिल्हा हा कायम दुष्काळग्रस्त जिल्हा असून एक टक्का सुद्धा बीड जिल्ह्याला जंगल क्षेत्र लाभलेले नाही या गंभीर बाबीकडेही राज्य शासन व बीडचे वनविभाग गांभीर्याने पाहत नसल्याने बीड जिल्ह्यातील वाढते टेंपरेचर यातून दिसून येत आहे. तब्बल पारा ४३ अंश वर पोहोचला असून दुपारच्या वेळी शहरातील रस्ते सामसूम झाले आहेत. बीड जिल्ह्यात वन क्षेत्र वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात राज्य शासनाच्या वतीने निधी उपलब्ध करून दिला जातो मात्र हा निधी कोणाच्या घशात जातो का असा प्रश्न उपस्थित होत असून इमामपूर रोड असलेल्या वन विभागाच्या जंगलात लागलेली आग कोण भिजवणार वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष करत हात वर केले आहे. जंगलात लागलेली आग शहरात पोहोचली तर याचे काय परिणाम होतील. जंगल क्षेत्रात लागलेली आग ही लागली का लावण्यात आली याची चर्चा आता होत आहे.

पान १ वरून पुढे...

## शेतकऱ्यांनो, २९...

जातींच्या मुलींचं कल्याण झालं आहे. चौथी मागणी, आमच्यावरच्या केसेस मागे घेतल्या जाव्यात. सरकारने शब्द दिला होता. पण आता ते विसरत आहेत. मराठ्यांनीच ही सत्ता मिळवून दिलेली आहे. जातीसाठी मी मरायला भीत नाही. मुंबईत त्यासाठीच येतोय, माझ्यावर हल्ला करायचा प्लॅन असेल तर मीच मुंबईत येतोय. जे आंदोलन आंतरवलीत होणार आहे, तेच मुंबईतही होणार आहे. २९ ऑगस्टला हे आंदोलन होईल. २८ ला मला सोडायला मुलं येतील त्यानंतर २९ तारखेला ते माघारी शेतीतली कामं करतील. माझ्या मुलांना जराही धक्का लागला तर कुणाचीच खैर करणार नाही. मुंबईमध्ये मी शांततेत आंदोलन करणार आहे. २८ ऑगस्टच्या आत सगळ्या अंमलबजावण्या झाल्या पाहिजेत. पुढची मागणी अशी की, हैदराबाद गॅझेट लागू करा. आमच्या संयमाचा अंत होत आहे. मुंबईत जाताना मी दोनच गोष्टी घेऊन जाणार आहे. एक विजयाचा रथ आणि दुसरा अंत्ययात्रेचा रथ दोन्हीपैकी एक वापस येणार, हे फडणवीसांनी लक्षात ठेवावं, असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे.

## प्रधानमंत्री आवास...

नंतर आधार फेस आरडी हे प देखील इंस्टॉल करुन घ्यावे, त्यानंतर आपले रजिस्ट्रेशन करून पवर विचारलेली माहिती भरावी, शेवटी आपल्या

पान १ वरून पुढे...

कच्च्या घराचा फोटो व आपण बांधणार असलेल्या घराची जागा यांचे फोटो अपलोड करावा, आधार व जॉब कार्डचे व्हेरिफिकेशन करून केलेला सर्व्हे अपलोड करावा.

## कार्यकर्त्यांच्या विजयासाठी...

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने आयोजित केलेल्या महाराष्ट्र गौरव यात्रेचे गेवराई शहरात जल्लोषात स्वागत करण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या ६५ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर महाराष्ट्र गौरव यात्रेचे आयोजन केले आहे. मराठवाडा विभागातील रथयात्रेचे बुधवार, दि. ३० एप्रिल रोजी दुपारी गेवराई शहरात भव्य स्वागत करण्यात आले. ढोलताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतिषबाजीने आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या उल्हासात यात्रेचे गेवराई शहरात स्वागत झाले. याप्रसंगी महाराष्ट्र गौरव यात्रेचे समन्वयक आ. विक्रम काळे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण, रमेश आडसकर, सेवादलाचे कार्याध्यक्ष शिवाजीराव बनकर, दत्ता भांगे, अंकिताताई विधाते, शिल्पाताई भोसले, बळीराम गवते, शेख निजामभाई आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. गेवराई तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने मान्यवरांचे भव्य स्वागत करण्यात आले. गेवराई शहरातील माती आणि गोदावरी व सिंदफणा नदीचे पवित्र जल संकलित करून त्यांचे विधीवत पूजन यानिमि

पान १ वरून पुढे...

त्ताने करण्यात आले. महाराष्ट्र गौरव यात्रेच्या आयोजना बाबतची भुमिका मराठवाडा यात्रा समन्वयक आ. विक्रम काळे यांनी यावेळी मांडली. राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे यांनी महाराष्ट्र गौरव रथयात्रेच्या आयोजनाचे महत्व आपल्या भाषणात विषद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ड. राजेश्वर चव्हाण यांनी केले. आ. विजयसिंह पंडित यांनी आपल्या भाषणात पक्ष संघटना मजबुत करून येणाऱ्या निवडणुकीत विजयासाठी सज्ज राहण्याचे आवाहन केले.

यावेळी ओबीसी सेलचे प्रदेश संघटक भारत काकडे, राष्ट्रवादी विद्यार्थी सेलचे जिल्हाध्यक्ष अजिंक्य आनेराव, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष विजय धायगुडे, तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण यांच्यासह गेवराई विधानसभा मतदार संघातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पाणीप्रश्नासाठी कायम...

पाटील, राजेसाहेब काका पवळ, राजाभाऊ महाराज कुटे, काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, अजय साळुंके पाटील, गणेश कोळेकर पाटील, सरपंच नवनाथ गवते, श्रीनिवास बेदरे, देविदास चव्हाण, राहुल लोंढे व समन्वयक दिनेश गुळवे यांची उपस्थिती होती. बीड जिल्ह्यातील शिरूर, बीड, गेवराई, वडवणी व माजलगाव या तालुक्यातून सिंदफणा नदी वाहते. सिंदफणा नदीवर साखळी बंधारे नसल्याने व जायकवाडी धरणाचे

पान १ वरून पुढे...

पाणी सिंदफणा नदी पात्रात सोडण्यासाठी लिफ्ट एरीगेशनची योजना नाही, यामुळे सिंदफणा नदी आठ ते नऊ महिने कोरडीठाक असते. सिंदफणा व गोदावरी नदीच्या मधील भागही दोन्ही नदीच्या पाण्यापासून वंचित आहे. त्यामुळे जायकवाडी धरणाचे पाणी मिळावे, उपकालवा करावा यासह इतर मागण्यांसाठी गेल्या वर्षभरापासून शेतकर्यांचे लोकलढा आंदोलन सुरू आहे. या शेतकर्यानी मार्चमध्ये १९ दिवस उपोषण केले होते. यावेळी खासदार रजनीताई पाटील यांनी शेतकर्यांना मदत करण्याचे आश्वासन दिले होते. यामुळे शेतकर्यांनी रजनीताई पाटील यांची भेट घेऊन पाणीप्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावा, असे साकडे घातले. यावेळी खासदार रजनीताई पाटील म्हणाल्या, की शेतकऱ्यांचा पाणीप्रश्न सोडविण्यासाठी सर्वोतोपरी मदत करणार. या भागातील पाणीप्रश्न दिवसेंदिवस अधिक भिषण होत आहे, याचा परिणाम शेती व शेतकर्यांवर होत आहे. त्यामुळे पाणीप्रश्न सोडविण्यासाठी सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे यावेळी रजनीताई पाटील म्हणाल्या.

## बीड शहर पोलिसांचा...

अधिकारी विश्वंभर गोल्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पी आय शितलकुमार बल्लाळ पोस्ट बीड शहर व एपीआय बाबा राठोड तसेच पीएसआय संदीप नेवरे साहेब यांच्या डी बी टीमने जयसिंग वायकर, अश्फाक सय्यद, सुशेन पवार, मनोज परजने, सचिन अलगट , गोवर्धन सोनवणे, तांबरे, अयोध्या डोके , शहाबाई कांबळे, शौकत यांनी ही कारवाई केली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# अखेर समता परिषदेच्या ३२ वर्षांच्या लढ्याला यश....

# देशात जातीनिहाय जनगणना होणार: ॲड. सुभाष राऊत

## बीडमध्ये समता परिषदेच्या वतीने फटाके फोडून आणि पेढे वाटून मोदी सरकारच्या निर्णयाचे स्वागत!

**माजलगाव । प्रतिनिधी**

मोदी सरकारने देशात जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल देशातील समस्त ओबीसी समाजाच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह संपूर्ण मंत्रिमंडळाचे आभार मानले जात आहेत. हा अतिशय क्रांतिकारी निर्णय असून स्वातंत्र्योत्तर भारतात प्रथमच जातनिहाय जनगणना होणार असल्याने बीड जिल्हा समता परिषदेने येथील क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले यांच्या पुळ्याजवळ फटाके वाजवून



आणि पेढे वाटून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले.

जातनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी १९९२ पासून अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या माध्यमातून सातत्याने विविध आंदोलने आणि पाठपुरावा करण्यात आलेला आहे. दिल्ली, पटना, राजस्थान, हजारीबाग, सतना, भोपाळ, गोवा, हैदराबाद आदी ठिकाणी झालेल्या अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या महामेळाव्यामध्ये माननीय छगनराव भुजबळ साहेबांनी देशातील ओबीसींची जात निहाय जनगणना व्हावी अशी जोरदार मागणी केली होती. २०१० मध्ये जातनिहाय जनगणना करण्यासाठी समता परिषद सुप्रीम कोर्टामध्ये गेली होती, त्याचवेळी तत्कालीन खासदार समीर भुजबळ यांच्या माध्यमातून संसदेत जोरदारपणे ही मागणी मांडली. त्यावेळी माजी केंद्रीय मंत्री स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब खंबीरपणे पाठीशी उभे राहिले. त्यानंतर देशाभरातील तब्बल १०० खासदारांचा भक्कम पाठिंबा मिळाला. या पाठपुराव्याचा परिणाम म्हणून तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री स्व. प्रणव मुखर्जी यांनी जातनिहाय जनगणनेची घोषणा केली. परंतु तेव्हा नगरविकास व ग्रामविकास खात्यामार्फत केवळ सर्वेक्षण करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे देखील पत्राद्वारे, तसेच व्यक्तिगतरीत्या ही मागणी मांडली होती. बीड जिल्हा समता परिषदेच्या वतीने या निर्णयाचे स्वागत क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीमाता फुले यांच्या पुळ्याजवळ फटाके वाजवून आणि पेढे वाटून करण्यात आले. यावेळी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड. सुभाष राऊत, परीट समाजाचे नेते गणेश जगताप, माळी महासंघाचे नेते प्रा. लक्ष्मण गुंजाळ, सोनार समाजाचे नेते ॲड. संदीप बेदरे, धनगर समाजाचे नेते रणजीत सोन्नर, समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष नितीन साखरे, शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, माळी महासंघाचे जिल्हाध्यक्ष धनंजय काळे, जयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष अजिंक्य सुरवसे, मोहनराव गोरे, महेश व्यवहारे, निलेश राऊत, पांडुरंग सत्वधर, अजय काळे, रोहित जमदाडे, मंगेश जमदाडे, महेश चौधरी आदींसह समता सैनिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



*माजलगाव लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि सुंदरनगर..आज दि.३०/४/२००५ रोजी अक्षय तृतीया चे शुभ मुहूर्तावर गाळप हंगाम २०२५-२६ चे हंगामा करीता तोडणी वाहतूक यंत्रणा कराराचे पुजन करून शुभारंभ करण्यात आला.प्रसंगी जेष्ठ संचालक श्री भागवतराव देशमुख, मुख्य शेती अधिकारी रविंद्र देशमुख*

## लोकनेते सोळंके कारखान्याचा ऊस तोडणी, वाहतुक कराराचा प्रारंभ

**माजलगाव । प्रतिनिधी**

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा आगामी गाळप हंगामाचा ऊस तोडणी, वाहतुक कराराचा मान्यवरांच्या हस्ते अक्षयतृतीयाच्या शुभमुहूर्तावर प्रारंभ करण्यात आला. तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना संस्थापक स्व.सुंदररावजी सोळंके साहेब यांच्या आशिर्वादाने व मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली हा कारखाना स्थापनेपासुन अविरत गाळप हंगाम करणारा मराठवाड्यातील नामांकित साखर कारखाना असुन,शेतकऱ्यांच्या ऊसला रास्त भाव देऊन, ऊसउत्पादक शेतकऱ्यांचे हित जोपासणारा कारखाना म्हणुन ओळखला जातो.या कारखान्याचा सन २०२५२६ ऊस गळीत हंगामासाठी ऊस तोडणी व वाहतुक करार प्रारंभ कारखान्याचे मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षय तृतीयीयाच्या शुभमुहूर्तावर दि.३०/०४/२०२५ रोजी करण्यात आला.यावेळी कारखाना शेती कार्यालयात घेण्यात आलेल्या छोटेखानी कार्यक्रमाच्या प्रारंभी माता वैष्णवी देवीचे पुजन करून जेष्ठ संचालक भागवतराव देशमुख यांच्या हस्ते कराराचा प्रारंभ करण्यात आला.यावेळी करार होणाऱ्या यंत्रणेस डव्हान्सचा पहिला हप्ता लवकरच देण्यात येणार आहे.याप्रसंगी ज्येष्ठ संचालक भागवतराव देशमुख म्हणाले की,पुढील हंगामात कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ऊस गाळपास आणण्यासाठी स्थानिक यंत्रणा अधिकाअधिक सक्षमपणे उभारण्यात येईल त्यासाठी कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त ऊस तोडणी, वाहतुक, कंत्राटदारांनी करार करावेत. असे आवाहन देशमुख यांनी केले. यावेळी ऊस तोडणी, वाहतुक कंत्राटदार यांच्यासह कार्यकारी संचालक आर. सी.बडगुजर ग्री मॅनेजर रविंद्र देशमुख, कारखाना सचिव सुरेश लगड, ऊस पुरवठा अधिकारी भोसले ऊस विकास अधिकारी स्वामीसह इतर उपस्थित होते.



*गेवराई -येथील भारतीय जनता पार्टीच्या गेवराई शहराध्यक्षपदी सचिन दाभाडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांना शुभेच्छा देताना मुन्ना शेठ कोकाट, राहुल मोटे, भागवत परळकर, बाळू दाभाडे बाळासाहेब आतकरे पत्रकार शुभम घोडके यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.*

## जल है तो कल है : तहसीलदार शेळके

**बीड । प्रतिनिधी**

जल व्यवस्थापन कृती पंधरवड्याचा समारोप व सत्कार समारंभ ३० एप्रिल २०२५ रोजी बीड जिल्ह्यात जलसंपदा विभागाच्या वतीने उत्साहात पार पडला . या पंधरवड्याचा उद्देश राज्यभरात पाणी व्यवस्थापन , संरक्षण आणि जनजागृती यावर भर देणे हा होता . या पंधरवड्यात सक्रिय सहभाग घेतलेल्या जिल्ह्यातील सर्व तालुक्याचे नोडल अधिकारी, व कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला . त्यांच्या योगदानामुळे विविध उपक्रम यशस्वीपणे राबवले गेले . प्रास्ताविक विनायक नखाते , कार्यकारी अभियंता , जायकवाडी पाटबंधारे विभाग क्र.३ बीड यांनी केले . जल व्यवस्थापन



कृती पंधरवडा २०२५ अंतर्गत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये झालेल्या कामांचे विवेचन करून केलेल्या सांघीक कामगिरी बाबत सर्व नोडल अधिकारी व कर्मचारी याबाबत माहिती दिली . समारोप समारंभात प्रमुख अतिथी म्हणून चंद्रकांत शेळके तहसीलदार , बीड व कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून पल्लवी जगताप , अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण बीड यांनी उपस्थित राहून जल व्यवस्थापनाच्या महत्त्वावर भाष्य केले . त्यांनी पाण्याच्या शाश्वत वापरासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले . डॉ राम बोडखे, प्राध्यापक आनंदराव धोंडे कॉलेज , आष्टी यांनी सराटे वडगाव या गावात जलसंवर्धन व जल व्यवस्थापन अंतर्गत केलेल्या कामांचे सादरीकरण करून जलसंवर्धन व जल व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर मधुकर वाघ , सेवानिवृत्त शाखा अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग किल्ले धारूर यांनी जलपुनर्भरण विषयी बीड शहर व इतर ठिकाणी केलेल्या कामाबाबत सादरीकरण करून जलपुनर्भरण याविषयी उपस्थित सर्व जलसंपदा अधिकारी कर्मचारी यांना मार्गदर्शन केले.



*बीड वकील संघाच्या सन्माननीय सदस्या ऍड अनिता चक्रे (वाघमारे )यांच्या नोटरी ऑफिसचे उदघाटन करून शुभेच्छा देताना बीड वकील संघांचे अध्यक्ष ऍड. रोहिदास येवले साहेब, सचिव ऍड. यासेर पटेल साहेब, उपाध्यक्ष ऍड. अविनाश गडगे साहेब व इतर*

## बसवअण्णा आधुनिक व प्रगत भारताचे आद्य प्रवर्तक : रोहित लंबे

**सिरसमार्ग । प्रतिनिधी**

आम्ही जात निहाय महातमे वाटून घेतले आहेत . महातमा बसवे श्वर कर्नाटक मधील कवि तत्वज्ञानी संत , बसव पुराणातील पहिल्या अध्यायात, बसव आणि त्यांच्या वडिलांमधील वाद यावर होता की वडील कर्मकांड अधिक मानायचे अन बसव अण्णा व्यक्तिगत पुजा . ब्राह्मण कुटुंबात जन्म नंतर स्थानिक शैव परंपरेच्या अधीन जीवन . बसवांनी त्यांच्या वचनास या नावाने प्रसिद्ध असलेल्या कवितेद्वारे सामाजिक जागरूकता पसरवली . त्यांनी लिंग किंवा सामाजिक भेदभाव, अंधश्रद्धा आणि विधी नाकारले. फुले शाहू आंबेडकर या विचाराचा जन्म कन्नड कडे झाला तो इथे . राजा बिजजल चे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी काम करताना आध्यात्मिकविकास साधला . अहिंसेचे एक प्रबळ प्रवर्तक म्हणून , त्यांनी मानव आणि प्राण्यांच्या बलिदानाचाही निषेध केला . ॐ नम शिवाय



हा मंत्र बसव अण्णा ने दिला . कर्नाटक मधील लिंगायत शक्ति बसव अण्णा चा स्वाभिमान जगते १०० विधानसभा संघातील निकाल लीनंगायत ठरवतात . आजवरच्या २३ मुख्यमंत्र्यात १० मुख्यमंत्री लिंगायत आहेत .

भारताचे तत्कालीन राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी २८ एप्रिल २००३ रोजी भारतीय संसदेत बसवेश्वरांच्या पुतळ्याचे उद्घाटन केले . लंडनमधील लॅम्बेथ येथे थेम्स नदीच्या काठावर बसवेश्वरांच्या पुतळ्याचे उद्घाटन केले .

असा संत आमच्यात होते हे माहिती असणारे एक आकडी टककयात असतील कारण सोशल मीडिया आम्हाला ही शिधोरी आम्हाला डेनार नाही . म्हणून आज थोड विस्तराने

नमन बसव अण्णा.गेवराई तालुक्यातील सिरसमार्ग येथे लिंगायत समाज बाधवांच्या वतीने बसव अण्णाची जयंत्ती साजरा करण्यात आल.

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती डी. के. पाटील साहेब ४थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ७००/२०२५**

**विजयमाला विरुध्द निरंक**

अर्जदार :- १) विजयमाला भ्र.बबन गायकवाड वय: ४४ वर्षे, धंदा घरकाम रा. लिंबागणेश ता.जि.बीड, २) सुरज पि. बबनराव गायकवाड वय २५ वर्षे, धंदा मजुरी रा. सदर, ३) आकाश पि. बबनराव गायकवाड वय: २५वर्षे, धंदा मजुरी रा. सदर, ४) उर्मिला भ्र. सुरज पवार वय २७ वर्षे धंदा घरकाम रा. राजूरी नवगण ता.जि.बीड ५) आशाबाई प्र. रानबा जाधव वय ४४ वर्षे धंदा घरकाम रा. लिंबागणेश ता.जि.बीड ६) कौसाबाई भ्र. प्रकाश मेंढके वय ४१ वर्षे धंदा घरकाम रा. कुंबेफळ ता. केज जि.बीड, ७) सोना भ्र. लक्ष्मण जाधव वय ३७ वर्षे धंदा घरकाम रा. कैकाड गल्ली, भगतसिंग चौक, अंबाजोगाई ता अंबाजोगाई जि.बीड

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र** (Heirship Certificate) **मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत नामे दत्तु पि. संतु गायकवाड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत नामे दत्तु पि.संतु गायकवाड रा. लिंबागणेश ता. जि. बीड यांचा मृत्यु दिनांक : ०४.१२.२०२१ रोजी लिंबागणेश ता. जि. बीड येथे झाला. अर्जदार क्र १ ही मयताच्या मयत मुलाची पत्नी म्हणजेच मयताची सुन आहे. अर्जदार क २ व ३ हे मयताचे जुळे नातु असून, अर्जदार क्र ४ ही मयताची विवाहीत नात आहे. तर अर्जदार क ५ ते ७ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयतास सदर अर्जदारांशिवाय इतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्युनंतर शासकीय व निमशासकीय कामाकरीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे असे अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत दत्तु पि.संतु गायकवाड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०४/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दिनांक १२/०६/२०२५. **आदेशावरून.**

**(मार्फत – ॲड. रोटे डी. एम.)**

(स्वाक्षरीत) अधीक्षक

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

### जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी. पाटील ६ वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ६९३/२०२५**

**मिरा उत्तम वाळके वि. विरूध्द निरंक**

अर्जदार- १. मिरा भ्र. उत्तम वाळके वय: ५६ वर्षे.धंदा घरकाम, रा. खंडाळा ता. जि. बीड ह.मु. नरेश नगर, कामतघर भिवंडी, ठाणे, २.नागेश पि. उत्तम वाळके वय: ३० वर्षे, धंदा – नोकरी, रा. सदर.३. साईनाथ पि. उत्तम वाळके वय: २८ वर्षे, धंदा – नौकरी, रा. सदर, ४.कल्पना भ्र. अशोक जाधव, वयः ३५ वर्षे, धदा – घराकाम, रा. शमशाबाद, ता. जि रंगारेड्डी, तेलंगणा राज्य, ५.रंगुबाई दामु वाळके, वय ७६ वर्षे, धंदा – घराकाम, रा. खंडाळा ता.जि. बीड

विरुध्द

गैरअर्जदार – निरंक **मागणी– वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत उत्तम पि. दामोदर वाळके,** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी **उत्तम पि. दामोदर वाळके** मृत्यु दि. ७/०२/२०२५ रोजी खंडाळा ता. जि. बीड येथे मयत झालेले असून अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहे. अर्जदार क २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क ४ ही मयताची विवाहित मुलगी आहे. अर्जदार क. ५ ही मयताची आई आहे. मयत उत्तम पि. दामोदर वाळके यांना अर्जदाराव्यतिरिक्त ईतर कुणीही वारस नाहीत. असे अर्जात नमुद आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददूल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत **उत्तम पि. दामोदर वाळके** यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २२ / ०४ / २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २१/०६/२०२५ आहे.

**(मार्फत – ॲड. रोटे डी. एम.)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) अधीक्षक

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५४७ / २०२५**

**मन्नाबी शेख वजीर शेख वि. निरंक**

ज्यापेक्षा शेख वजीर पि. शेख चाँद, हे दिनांक ३०.१२.२०२४ रोजी पॅराडाईज हॉस्पीटल, बीड, ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

१ मन्नाबी शेख वजीर शेख, वय – ५५ वर्षे, रा. इस्लामपुरा, बीड, ता.जि. बीड, २.शेख शफिक पि. शेख वजीर, वय – ३४ वर्षे, रा. इस्लामपुरा, बीड, ता.जि.बीड ३. शेख इरफान पि. शेख वजीर, वय – ३३ वर्षे, रा. इस्लामपुरा, बीड, ता.जि. बीड ४. रजियाबानो भ्र अब्दुल रहीम शेख, वय – ४१ वर्षे, रा. नित्रुड, ता. माजलगांव जि. बीड ५.नजमा भ्र. रफिक शेख वय – ३३ वर्षे, रा. पिंपळारूई, ता. वडवणी जि.बीड ह.मु. इस्लामपुरा, बीड ता.जि.बीड, ६. शेख अजमत पि. शेख रफिक वय – १३ वर्षे, रा. पिंपळारूई, ता. वडवणी जि.बीड ह.मु. इस्लामपुरा, बीड ता. जि. बीड, ७.मेहम्मद उमर पि. शेख रफिक वय – ११ वर्षे, रा. पिंपळारूई, ता. वडवणी जि.बीड ह.मु. इस्लामपुरा, बीड ता. जि. बीड

अर्जदार १ हि मयत नामे **वजीर पि. शेख चाँद,** यांची पत्नी आहे. अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार कं. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. अर्जदार क. ५ ही मयताच्या मयत मुलाची पत्नी म्हणजेच मयताची सुन असुन अर्जदार क्र. ६ व हे मयताचे नातु आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत वजीर पि. शेख चाँद, यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख ०९/०५/२०२५ आहे. आज दिनांक २९ एप्रिल २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले

**(मार्फत – ॲड. रोटे डी. एम.)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) अधीक्षक

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

### जाहीर प्रगटन

**मा.श्री आर. जी. बागडे साहेब, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ६९२/२०२५**

**चांगदेव विरूद्ध निरंक**

अर्जदार १. चांगदेव पि. भाऊराव चव्हाण, वय ७० वर्षे, धंदा –शेती, रा. सफेपुर, ता. जि. बीड, २. पारुबाई भ्र. उत्तम करडुले, वय – ७५ वर्षे, धंदा – घरकाम, रा. सदर., ३. दरुबाई भ्र. रावसाहेब ढवळे, वय ८४ वर्षे, धंदा घरकाम, रा. चौदसवाडी, ता. जि. बीड. ४. राधाबाई भ्र. नामदेव चव्हाण, वय ५२ वर्षे, धंदा –घरकाम, रा. सफेपुर, ता. जि. बीड. ५. सचिन पि. नामदेव चव्हाण, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ६. मिलिंद पि. नामदेव चव्हाण, वय २८ वर्षे, धंदा शेती, रा. सदर. ७. मीना भ्र. वसंत पटाईत, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. सदर.

**मागणी – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत द्रोपदीबाई भ्र. भाऊराव चव्हाण मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत **द्रोपदीबाई भ्र. भाऊराव चव्हाण** यांचा मृत्यु दिनांक २५/११/२००७ रोजी झाला आहे. वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

मयत द्रोपदीबाई भ्र. भाऊराव चव्हाण यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत द्रोपदीबाई भ्र. भाऊराव चव्हाण यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०४/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १८/०६/२०२५ आहे.

**(मार्फत – ॲड. रोटे डी. एम.)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) अधीक्षक

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र

गुरूवार, दि.०१ मे २०२५ पान ४




वांगी: शेतकरी बाराही महिने शेतामध्ये राबत असतो.. उन्हाळ्यामध्ये शेतात शेणखत टाकण्यासाठी गाडी बैलाने भर उन्हाच्या पाऱ्यात शेणखत घेऊन जात असताना शेतकरी बंडू शेळके, पिंटू शेळके छायाचित्रात दिसत आहेत. (छाया - आराध्य नरनाळे)

# जिल्हाधिकारी साहेब प्रशासनाच्या आशिर्वादाने कुंडलीका धरणातुन अवैध गाळ उपसा सुरू

**शेतकऱ्यांना गाळ देण्या ऐवजी विटभट्टीधारकाना विकला जातोय गाळ ; गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेचे वाजले तीन तेरा ; गाळ माफिया माला-माल शेतकरी कंगाल**

**बीड । प्रतिनिधी**

धारुर तालुक्यातील धुनकवाड येथील कुंडलीका धरणातुन अवैध गाळ उपसा सुरू असुन हा गाळ शेतात जात नसुन विटभट्टी धारकांना विकला जात असुन गाळ माफियांचा नंगानाच चालु आहे तरी हा गाळ शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी खुला करुन देऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा व अवैध गाळ उपसा करणा-यांवर कारवाई करावी अशी मागणी शेतकऱ्यांतुन होत आहे. धुनकवाड येथील कुंडलीक धरणातुन अवैध गाळ उपसा रात्रं-दिवस चालू आहे भुसंपादीत झालेल्या जमिनीत शासनाला कुठलीही रॉयल्टी भरत नाहीत व विटभट्टीला अवैध गाळ विकुन गाळ माफिया लाखो रुपये कमवत आहेत.तरी हा गाळ शेतकऱ्यांचा शेतात टाकण्यासाठी प्रशासनाने काही तरी उपाययोजना कराव्यात.





बीड जिल्ह्यात वाळू माफिया,भू-माफिया, राख माफिया यानंतर आता गाळ माफिया निर्माण झाले असून त्या गाळ माफीया यांना आवर घालण्याचे आवाहन नवनिर्वाचित जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्यासमोर आहे.

धुनकवाड येथे कुंडलीका धरण असुन या धरणामुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी या धरणात गेल्या त्याचा मावेजा ही शासनाने त्या शेतकऱ्याला दिला परंतु ह्या गाळपेरा म्हणून हे शेतकरी पिक घेऊ लागले व आता तर या गाळपेराच्या नावाखाली येथील शेतकरी विटभट्टीधारकांना गाळ विकु लागले असल्याने प्रशासनाच्या जमिनीचा मावेजा घेऊन ही शासनाच्या जमिनीवर हे शेतकरी लाखो रुपयांचा गाळ विकु ▶▶ उर्वरित पान २ वर

**●गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेचे वाजले तीन तेरा...**

धरणांमध्ये दरवर्षी साठत चाललेल्या गाळामुळे धरणांच्या साठवण क्षमतेत मोठया प्रमाणात घट होत आहे. धरणांमध्ये साचलेला गाळ उपसा करुन शेतात पसरविल्यास धरणांची मुळ साठवण क्षमता पुर्नःस्थापित होण्याबरोबरच शेतकऱ्यांना कृषि उत्पन्नात वाढ होईल म्हणून मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने शेतकर्यांसाठी संजीवनी ठरलेली गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार ही योजना विटभट्टीधारकांच्या घशात घातली असून शेतकरी या योजनेपासून वंचित राहत असल्याने गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजनेचे तीन तेरा वाजले आहेत.

**●जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी भेट देऊन पाहणी करावी...**

धारुर तालुक्यातील धुनकवाड येथील भुसंपादित झालेल्या जमिनीतुन कुंडलीका धरणातुन अवैध गाळ उपसा सुरू असुन गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना शेतात गाळ टाकण्यासाठी ही योजना आहे परंतु हा गाळ विटभट्टी धारकांना विकला जात असल्याने शेतकऱ्यांना हा गाळ उपलब्ध होत नाही म्हणून शेतकरी या योजनेपासून वंचित राहत आहेत तरी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी एकदा भेट देउन ह्या गाळ माफियांचा कसा नंगानाच चालु आहे हे बघून याकडे लक्ष देऊन हा गाळ शेतात टाकण्यासाठी शेतकऱ्यांना खुला करुन देण्यात यावा अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# प्राथमिक पदवीधर शिक्षकांचे उपोषण तात्पुरते स्थगित

**युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागरांची मध्यस्थी ; ना.अजितदादांसमोर प्रश्न मांडण्याची ग्वाही**

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक पदवीधर, भाषा व सामाजिक शास्त्र विषयाच्या ७४ शिक्षकांनी गणित व विज्ञान विषयांत रूपांतर करण्याच्या मागणीसह इतर विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू होते. उपोषणस्थळी राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२९) भेट देत शिक्षकांशी




संवाद साधला. त्यांच्या यशस्वी मध्यस्थीमुळे उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

# खते बी बियाणे कीटकनाशके कायदा करण्यास महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकार नापास: वसंत मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

बोगस खते बी बियाणे कीटकनाशके औषधी कृषी निष्ठा उत्पादक व विक्रेते दुकानदारा मार्फत शेतकऱ्यांना विक्री करून आर्थिक



व्यवहाराचे लागे बंद असलेले सोनेरी टोळक्याने धुमाकूळ घातलेला आसुन खाजगी कंपनीच्या दबावापोटी खते बियाने कीटकनाशके कायदा करण्यास महाराष्ट्रातील त्रिमूर्ती सरकार अकार्यक्षम असल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला . तिन्ही माझी कृषिमंत्र्यांनी व कृषी खात्याच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी अनेक योजनेमध्ये टक्केवारीचा गोंधळ घातल्यामुळे शेतकऱ्याला सर्व

▶▶ उर्वरित पान २ वर

# शेतकऱ्यांनो घरच्या घरी फार्मर आयडी काढा, नोंदणी करा : तहसीलदार शेळके

**बीड । प्रतिनिधी**

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बीड जिल्ह्याचा पदभार घेतल्यापासून अनेक कामे वेगाने सुरू केली आहेत . सोबतच त्यांचा भर शेतकऱ्यांची कामे करणे, शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे यावर दिसून आलेला आहे . जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांना भेटून त्यांच्या समस्या ते जाणून घेत आहेत . त्यासाठी जनता दरबार सुद्धा सुरू केलेला आहे . सोबतच विविध अधिकाऱ्यांच्या समक्ष किंवा ऑनलाईन बैठका घेऊन त्यांनी प्रशासकीय कामकाजाची




घडी बसविण्याचा प्रयत्न केल्याची दिसून येते . सध्या शासन स्तरावर शेतकऱ्यांना फार्मर आयडी काढून देण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाठपुरावा करण्यात येत आहे . फार्मर आयडी रजिस्ट्रेशन म्हणजे भारतातील शेतकऱ्यांसाठी तयार केलेल्या ▶▶ उर्वरित पान २ वर

# बॅनर,झेंडे व पोस्टर तात्काळ हटवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

**●झेंडे लावण्यावरून झाला होता तणाव निर्माण**

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाभरात ठिकठिकाणी सण, उत्सव,जयंती, धार्मिक कार्यक्रम या अनुषंगाने चौकाचौकात रस्त्यांवर बॅनर,झेंडे, पोस्टर्स, लावले जातात. मात्र सण, उत्सव होऊन गेले तरी ते काढले जात नाहीत, मागील आठवड्यात आष्टी तालुक्यातील खडकत येथे झेंडा लावण्याच्या कारणावरून गावात तणाव निर्माण फोन दोन गट आमने-सामने भिडले होते, तर दुसरी घटना गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथील एका धार्मिक स्थळांवर झेंडे लावल्याने तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती परंतु पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने परिस्थिती नियंत्रणात आली होती. यामुळे जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याच्या पार्श्वभूम िवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सदरील बॅनर्स, पोस्टर्स आणि झेंडे तात्काळ हटविण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले आहेत. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अवैध बॅनर्स, होर्डिंग्जस्, पोस्टर्स आणि झेंडे लावण्यात येतात. विशेषतः




सण, उत्सव, यात्रा, उर्स, सप्ताह, जयंती, धार्मिक प्रवक्त्यांचे कार्यक्रम इत्यादींच्या अनुषंगाने सर्व समाज व धर्माचे लोक आणि संघटनांकडून जिल्ह्यातील विविध चौकात, मुख्य रोडवर, सार्वजनिक ठिकाणी विविध झेंडे व त्यास अनुसरुन बॅनर लावण्यात येतात.

सदरील कार्यक्रम संपन्न होऊन बरेच दिवस झाले तरी ते काढले जात नसल्याचे निदर्शनास येत आहे. यामुळे बीड जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असून जिल्ह्यातील सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थेचा भंग होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बीड जिल्ह्यातील सर्व

▶▶ उर्वरित पान २ वर

# बनसारोळा येथे १० लक्ष किमतीच्या शाळा खोली बांधकामाचे भूमिपूजन

**ग्रामीण विद्यार्थ्यांची गैरसोय दूर करण्याचा आमचा प्रयत्न : सचिन मुळूक**

**बीड । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बनसारोळा येथील जिल्हा परिषद शाळेच्या नूतन खोली बांधकामासाचे भूमिपूजन शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या हस्ते करण्यात आले. मुळूक यांच्या प्रयत्नाने जिल्हा नियोजन निधीतून बनसारोळा शाळेला १० लक्ष निधी मंजूर करण्यात आला आहे. यामुळे गावातील विद्यार्थ्यांना आता नवी शाळा इमारत मिळणार असल्याने ग्राम स्थांनी समाधान व्यक्त केले. केज तालुक्यातील बनसारोळा येथील



जिल्हा परिषद शाळेची इमारत जीर्ण झाली असल्याने विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या संबंधी सरपंच अजित गोरे यांनी नवीन इमारती संदर्भात शिवसेना जिल्हाप्रमुख

▶▶ उर्वरित पान २ वर



## अंबाजोगाईतील युवकाचा गोदावरीत बुडून मृत्यू

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

त्रिंबकेश्वर दर्शनासाठी गेलेल्या अंबाजोगाई तालुक्यातील राडी येथील मुळे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. राडी येथील मुळे कुटुंबीय देवदर्शनसाठी नाशिकला गेले होते. मंगळवारी (दि. ३० एप्रिल) सायंकाळी ५ वाजता बालाजी रामभाऊ मुळे हा युवक नाशिकच्या पवित्र राम कुंडावर गेला असता, त्याचा पाय घसरल्याने तो थेट गोदावरी नदीत पडला आणि क्षणार्धात जोरदार

▶▶ उर्वरित पान २ वर

# वन विभागाच्या इमामपूर जंगलात आग

**वनपरिक्षेत्र अधिकारी काकडे यांचे दुर्लक्ष**
**दुपारी लागलेली आग संध्याकाळपर्यंत सुरूच ; आगीचे कारण गुलदस्त्यात; अधिकाऱ्यांनी हात झटकले**

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरापासून जवळ असलेल्या इमामपूर जंगलात काल दुपारी तीनच्या दरम्यान भीषण आग लागली या आगीम ध्ये हजारो झाडे जळून खाक झाली आहे याकडे वन विभागाचे दुर्लक्ष असून वनपरिक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांनी हे क्षेत्र वन विभागाच्या अंतर्गत येत नसल्याचे सांगत हात झटकले आहे. भर उन्हाळ्यात लागलेली आग कोणी लावली का लागली याची चर्चा होत असून वन विभागाच्या जंगलात लागलेली आग विजविण्यासाठी वन विभागाचे तथा इतर कोणीही आले नसल्याने नेमके आग कोणाच्या कार्यक्षेत्रात लागली यावर प्रश्नचिन्ह निम र्ण होत असून इमामपूर येथील जंगल वन विभागाच्या अंतर्गत तथा काही प्रमाणात गायरान आहे.

बीड जिल्ह्यात नाममंत्र जंगल क्षेत्र असूनही याकडे वनविभागाचे कायम दुर्लक्ष राहिलेले आहे. बेसुमार वृक्षतोड यावर लगाम लावण्यास वन अधिकाऱ्यांना आलेले अपयश यामुळे



दररोज होत असलेली हजारो झाडांची कत्तली यामुळे पर्जन्यमान कमी प्रमाणात बीड जिल्ह्यात पडतो. याला प्राकृति जबाबदार नसून बीडमध्ये वन विभागात कार्यरत असणारे अधिकारी कर्मचारी चवदार असल्याचे दिसून येत आहे. इमाम पूर रोडवर असलेल्या वन विभागाच्या जंगलात काल दुपारी लागलेली आग संध्याकाळपर्यंत सुरूच होती. याकडे कोणत्याच अधिकाऱ्याला लक्ष द्यायला वेळ नाही का ? या जंगलात वन विभागाने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केलेली आहे ही आग लागली का लावण्यात आली असा प्रश्न उपस्थित होत असून आग विझवण्यासाठी वन विभागाकडून कोणतेच प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाही.

शहरापासून काहीच अंतरावर इमामपूर या गावा शेजारीच वन विभागाने मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड केलेली आहे. या ठिकाणी गायरान जमीन सुद्धा मोठ्या प्रमाणात आहे मात्र वन विभागाने वन क्षेत्रातच वृक्ष लागवड केलेली आहे या वृक्ष ▶▶ उर्वरित पान २ वर

